
# मुंबई लोकलवर तूर्त निर्बंध लागू होणार नाहीत



**मुंबई :** मुंबईतील उपनगरीय रेल्वे प्रवाशांवर सध्या तरी कोणतेही निर्बंध लागू केले जाणार नाहीत, असे मंत्रालयातील उच्चपदस्थांकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनीदेखील याला दुजोरा दिला असून मुंबईची लोकल सध्या बंद करण्याचा कोणताही विचार राज्य सरकारसमोर नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. या वेळी त्यांनी जिल्हांतर्गत बंदी लावण्याचाही सरकारचा कोणता विचार नाही, अशी माहिती दिली, तसेच तूर्तास लॉकडाउन लावण्याचा कोणताही विचार नसल्याचा पुनरुच्चार केला. या वेळी त्यांना लॉकडाउन, नाईट कर्फ्यू लावणार का, असे विचारण्यात आले असता म्हणाले की, या सर्व पर्यायांवर चर्चा झाल्या आहेत, मात्र त्यासंबंधी कोणताही निर्णय झालेला नाही. मुख्यमंत्री याबाबत निर्णय घेतील.

शुक्रवार, ७ जानेवारी २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक १७१
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

नाना पटोलेंनी मर्यादेत रहावे -चंद्रकांत पाटील/२

फणसाड अभयारण्यात प्रवेशासाठी निर्बंध लागू/५

महिला वर्ल्डकपसाठी टीम इंडियाची घोषणा/६

### सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे पारितोषिक वितरण

# दिवाळी अंकांतून साहित्य निर्मितीचे काम

## ज्येष्ठ कवी व साहित्यिक रामदास फुटाणे यांचे प्रतिपादन



(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ६ वर..

**पनवेल : हरेश साठे**

दिवाळी अंकांतून साहित्य निर्मितीचे काम केले जाते. मराठी साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नैतिक जबाबदारी उचलली आहे. म्हणून भरघोस रकमेची पारितोषिके असलेली राज्यातील सर्वांत मोठी दिवाळी अंक स्पर्धा त्यांच्या माध्यमातून दरवर्षी भरवली जात असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ कवी व साहित्यिक रामदास फुटाणे यांनी केले. ते खांदा कॉलनी येथे झालेल्या दिवाळी अंक पारितोषिक वितरण समारंभात बोलत होते.

सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या १८, १९ आणि २०व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय या सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे पारितोषिक वितरण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. ५) खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) मोठ्या उत्साहात आणि समारंभपूर्वक झाले. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून रामदास फुटाणे बोलत होते.

कोरोनासंदर्भातील नियमांचे पालन करून झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी महासंचालक तथा जलसंधारण विभागाचे सचिव दिलीप पांढरपट्टे, ललित मासिकाचे स्तंभलेखक रविप्रकाश कुलकर्णी, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक अनिल भगत, मनोज भुजबळ, प्रभाग समिती सभापती सुशिला घरत, हेमलता म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये, दीपक म्हात्रे, तसेच साहित्यप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस 'अनाथांची माय' सिंधुताई सपकाळ यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. (पान २ वर..)

> कर्तृत्व आणि दातृत्व असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर एकमेव व्यक्तिमत्त्व

*मराठी साहित्य संस्कृतीला उज्वल परंपरा असून दिवाळी अंक हा यातील अविभाज्य भाग आहे. दिवाळीला जसे दारात आकाशकंदिल लागतात, तसे मनामनांत विचारांचे कंदिल चेतवण्याचे काम दिवाळी अंक करतात. साहित्य आपल्याला आत्मिक सुख देते. त्यामुळे मातृभाषेची किंमत अनन्यसाधारण आहे.*

**–लोकनेते रामशेठ ठाकूर**, माजी खासदार

*कोरोनाच्या संकटात लाटा येतच राहणार आहेत. कितीही लाटा येऊ द्या, प्रत्येक क्षण आनंदाने जगले पाहिजे. २०२०-२१मध्ये जिवंत राहण्याचे चॅलेंज होते ते वर्ष सरले, पण आता प्रत्येकाने स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माझी जुनी ओळख आहे. आजही त्यांच्याकडे जाण, नम्रपणा आहे. त्यामुळे संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याप्रती भावना आहेत.*

**–दिलीप पांढरपट्टे**, कवी व गजलकार

*लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या आशीर्वादामुळे या स्पर्धेचे आयोजन केले जात असून महाराष्ट्रातील सर्वांत मोठी म्हणून ही स्पर्धा सुपरिचित आहे. दिवाळी अंक महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा आहे आणि त्याला प्रोत्साहन देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या इतिहासात सर्वांत मोठी देणगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिली असून त्यांचे आम्ही सदैव ऋणी आहोत.*

**–नरेंद्र वाबळे**, अध्यक्ष, मुंबई मराठी पत्रकार संघ

# काँग्रेसने निर्लज्जपणाचा कळस गाठला!





### पंजाबवरील घटनेवरून देवेंद्र फडणवीस संतापले

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसचे नेते पंतप्रधानांच्या सुरक्षेबाबत ज्या रीतीने विधाने करताहेत तो निर्लज्जपणाचा कळस आहे. या नेत्यांमध्ये अपरिपक्वता दिसून येते. १५० वर्ष जुन्या पक्षाच्या नेत्यांकडून अशी विधाने होताहेत, असा हल्लाबोल माजी मुख्यमंत्री आणि विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ताफा पंजाबमध्ये आंदोलनामुळे अडकून पडल्याच्या घटनेवरून फडणवीस यांनी गुरुवारी (दि. ६) मुंबईत पत्रकार परिषद घेत काँग्रेसवर तोफ डागली.

फडणवीस म्हणाले की, पंजाबमध्ये जी घटना घडली ती अतिशय गंभीर आहे. देशातील वेगवेगळ्या राज्यांत विविध पक्षांचे सरकार असते, पण देशाच्या पंतप्रधानांच्या सुरक्षेशी अशा प्रकारे खेळ यापूर्वी कधीही पाहिला नाही. पंजाबमधील घटना ही विचारपूर्वक केल्याचा कट दिसून येतो. पंतप्रधानांचा दौरा असतो तेव्हा सुरक्षेबाबत काही नियमावली आहेत, त्या तंतोतंत पाळाव्या लागतात. सुरक्षेच्या नियमांची पुस्तिका असते. त्या पुस्तिकेप्रमाणे राज्यातील सुरक्षा दल, केंद्राचे सुरक्षा दल यांनी समन्वयाने काम करावे लागते. त्यामुळे याबाबत राज्याला माहिती नाही हे कसे होऊ शकते, असा आरोप त्यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ताफा थांबवला जाईल आणि रास्ता ब्लॉक होईल असे जाणीवपूर्वक घडवण्यात आले. १५ ते २० मिनिटे ताफा अडवण्यात आला. तिथून पाकिस्तानची बॉर्डर अतिशय जवळ आहे. पंतप्रधान मोदींचा जीव धोक्यात घालण्याचे काम पंजाबच्या सरकारने केले. या कठीण प्रसंगात मुख्यमंत्री फोनवर येण्यास तयार नाही. त्यामुळे हे सगळे पूर्वनियोजित होते. या घटनेचा आम्ही निषेध करतो. पंतप्रधानांच्या सुरक्षेबाबत जे काही घडले ते देशाने गंभीरतेने घेतले पाहिजे. देशाच्या पंतप्रधानांवर हल्ला हा त्या व्यक्तीवर नसतो, तर देशावर असतो. पंतप्रधानांच्या सुरक्षेत हलगर्जीपणा करणाऱ्या लोकांना कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी फडणवीस यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींना जनतेचा आशीर्वाद आहे. त्यामुळे मोदींच्या केसालाही धक्का लागू शकत नाही. काँग्रेसचे नेते चोराच्या उलट्या बोंबा मारत आहेत. काँग्रेसचा खरा चेहरा लोकांसमोर आला आहे. पंजाबमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षेला धोका पोहचवण्याचे षडयंत्र रचणारे आणि त्यांना समर्थन करणारे यांना देशातील जनता कधीच माफ करणार नाही, असेही फडणवीस म्हणाले.

## मुंबईत भाजपचा मोर्चा; पोलिसांकडून अडवणूक

**मुंबई :** पंजाबमध्ये पंतप्रधान मोदींच्या सुरक्षेमध्ये गंभीर चूक झाल्याचे केंद्रीय गृहमंत्रालयाकडून सांगण्यात आले आहे. या घटनेचे पडसाद मुंबईत उमटले असून भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. त्यांनी गुरुवारी (दि. ६) मोर्चा काढला होता.

मुंबईतील भाजप कार्यकर्त्यांनी काँग्रेसच्या टिळक भवनावर गुरुवारी मोर्चा काढला. पोलिसांनी या कार्यकर्त्यांना फुल मार्केट परिसरात रोखले. आमदार कॅप्टन तामिल सेलवन यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले होते. या वेळी कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली.

## निवडक

### यूपीएससी परीक्षा होणारच; हायकोर्टाने याचिका फेटाळली

**नवी दिल्ली :** देशात कोरोना आणि ओमायक्रॉनचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यामुळे शाळा, कॉलेजेस बंद करण्यात आली असून केंद्रीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा मुख्य परीक्षा (यूपीएससी) पुढे ढकलण्याची मागणी केली होती, मात्र उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली आहे. यामुळे देशात यूपीएससी परीक्षा ७, ८, ९, १५ व १६ जानेवारी २०२२ रोजी नियोजित वेळापत्रकानुसार होणार आहे.

### राज ठाकरे यांच्याविरोधात परळी कोर्टाकडून वॉरंट जारी

**परळी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात परळीमधील न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले आहे. २००८ साली मनसे कार्यकर्त्यांनी राज यांच्या समर्थनार्थ परळीत परिवहन मंडळाच्या बसेसवर दगडफेक केल्याप्रकरणी राज्य सरकार विरुद्ध राज ठाकरे असा युक्तिवाद सुरू आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० फेब्रुवारी रोजी होणार आहे.

# किल्ले रायगडावरील मदार मोर्चा हस्तक्षेपावरून शिवभक्तांमध्ये संताप

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावरील मदार मोर्चा येथील बांधकामाला पांढरा रंग फासून व तेथे चादर चढवून होत असलेल्या प्रकाराने शिवभक्तांच्या भावना संतप्त झाल्या आहेत. या प्रकाराबद्दल छत्रपती संभाजीराजे यांनी गुरुवारी (दि. ६) पुरातत्त्व विभागास पत्र देऊन या प्रकरणी कारवाई करण्याची मागणी केली आहे.



काही दिवसांपूर्वी अज्ञात व्यक्तींनी दुर्गराज रायगडावरील मदार मोर्चा येथील बांधकामाला पांढरा रंग फासला व तेथे चादर चढवून ते प्रार्थनास्थळ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनाच्या नियमांमध्ये या गोष्टी प्रतिबंधित असताना किल्ले रायगडसारख्या ऐतिहासिक ठिकाणी अशा गोष्टी होणे अतिशय चुकीचे आहे. किल्ले रायगडचे पावित्र्य व ऐतिहासिक महत्त्व अबाधित राहावे यासाठी मदार मोर्चा या ठिकाणी करण्यात आलेली रंगरंगोटी हटवून तिथे कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकाम अथवा रचना करण्यास तत्काळ पायबंद घालण्यात यावा, अशी मागणी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी केली आहे.

**पुरातत्त्व विभागाने घेतली दखल**

**किल्ले रायगड हा संवेदनशील विषय असून या गोष्टीला पायबंद घातला नाही, तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. या शिवभक्तांच्या भावना लक्षात घेत किल्ले रायगडावरील मदार मोर्चाप्रकरणी पुरातत्त्व विभागाने या वास्तूला लावलेला पांढरा रंग काढून टाकला आहे, तसेच या ठिकाणी सुरक्षा रक्षक तैनात केले आहेत.**



**मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी पंजाबमध्ये एका जीवघेण्या संकटातून सुखरूप बचावल्याबद्दल ऋण व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी मुंबादेवीचे दर्शन घेतले. (वृत्त पान २ वर..)**

## जासई विद्यालयातील मुख्याध्यापक कक्ष, अटल लॅब, पाणपोईचे आज उद्घाटन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभागातर्फे विद्यालयातील नूतनीकरण केलेला मुख्याध्यापक कक्ष, अटल टिंकरिंग लॅब व पाणपोईचा उद्घाटन समारंभ शुक्रवारी (दि. ७) सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, रायगड विभागीय अधिकारी रोहिदास ठाकूर यांच्यासह रयत शिक्षण संस्था, स्थानिक सल्लागार समिती व शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सदस्य आणि स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी



पनवेल महानगरपालिका हद्दीत
शुक्रवार, दि. ७ जानेवारी २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे

(पहिल्या सहा आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.)

- ७. मनुस्मृती रोटरी क्लब, से. ३०, ओवे गाव, खारघर
- ८. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ९. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- १०. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- ११. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली ११. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. काळण समाज हॉल, पनवेल
- ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

१५ ते १८ वयोगटाचे लसीकरण

- कोकण एज्युकेशन सोसायटी केव्ही हायस्कूल, पनवेल (उपलब्ध लसी ५००)
- महात्मा मराठी इंटरनॅशनल (सीबीएसई) शाळा खांदा कॉलनी (५००)
- पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग नवीन पनवेल (४५५)
- सी. के. ठाकूर विद्यालय मराठी इंग्रजी माध्यमिक, न्यू पनवेल (५००)
- के. इ. एल. सोसायटीचे ज्यु. कॉलेज, कळंबोली (५००)
- रायन इंटरनॅशनल स्कुल खारघर (५००)
- पी. जे. म्हात्रे विद्यालय नावडे (५००)
- छत्रपती शिवाजी विद्यालय रोहिंजण (५००)
- न्यू इंग्लिश स्कुल कामोठे, (१०३)
- श्री सुविद्या विद्यालय कामोठे प्राथमिक शाळा (४६)
- एच बी पी श्री दामाजी गणपत गोवरी विद्यालय कामोठे (६९)

# नाना पटोलेंनी मर्यादेत राहावे!

■ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा इशारा

■ मोदीजींच्या दीर्घायुष्यासाठी मुंबादेवीला प्रार्थना

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी पंजाबमध्ये एका जीवघेण्या संकटातून सुखरूप बचावल्याबद्दल ऋण व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी (दि. ६) मुंबईत मुंबादेवीचे दर्शन घेतले. या वेळी पत्रकारांशी संवाद साधताना पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी बोलताना नाना पटोले यांनी मर्यादेत राहावे नाही तर आम्हाला बोलावे लागेल, असा इशारा दिला.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा गाड्यांचा ताफा बुधवारी पंजाबमध्ये एक फ्लायओव्हरवर अडकला तेथून पाकिस्तानची सीमा केवळ १० किलोमीटर अंतरावर आहे. पंतप्रधान फ्लायओव्हरवर २० मिनिटे होते. त्या वेळी कोठूनही हल्ला होण्याचा धोका होता. पंजाबमधील काँग्रेस सरकारमुळे हे संकट ओढवले, पण मोदीजी सुखरूप वाचले. त्याबद्दल देवाचे ऋण व्यक्त करण्यासाठी आणि मोदीजींना दीर्घायुष्य मिळण्याची प्रार्थना करण्यासाठी आपण मुंबादेवीचे दर्शन घेतले.

पाटील पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्य मिळो, त्यांचे आरोग्य चांगले राहो आणि त्यांच्या हातून अशीच देशाची सेवा घडो यासाठी जगभरातील भारतीयांनी प्रार्थना केली. देशभरातील भारतीयांनी इष्टदेवतेचे ऋण व्यक्त केले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पंतप्रधानांविषयी केलेल्या टीकाटिप्पणीबाबत एका पत्रकाराने प्रतिक्रिया विचारली असता पाटील म्हणाले की, नाना पटोले कधीच गंभीर नसतात आणि कोणी त्यांची गंभीर दखलही घेत नाही. ते काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असल्याने त्यांचे म्हणणे किमान ऐकले जाते.

## अतुल वझे यांची नियुक्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश महामंत्रिपदी (मुख्यालय) अतुल वझे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी वझे यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी या वेळी अन्य काही नियुक्त्याही जाहीर केल्या. मनोज पांगारकर यांची प्रदेश सचिवपदी, आमदार राहुल नार्वेकर यांची माध्यम विभागाच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



पनवेल : एक्स्ट्रा मार्क्स एज्युकेशन मुंबईचे बिझनेस हेड गौरव जगरवाल यांनी अॅकॅडमिक हेड अंजू जोस आणि डेप्युटी मॅनेजर उमेज मुल्ला यांच्यासमावेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट घेऊन शैक्षणिक क्षेत्रासंबंधी चर्चा केली.

## पनवेल मनपा कार्यालयात प्रवेशसाठी लसीचे दोन डोस बंधनकारक

**पनवेल : प्रतिनिधी**

राज्य शासनाने कोरोना विषाणूचा वाढता प्रसार रोखण्यासाठी राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू आहेत. त्यानुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कार्यालयांमध्ये प्रवेश करणाऱ्या सर्व अभ्यागतांना चेहऱ्यावर मास्क परिधान करणे, तसेच कोविड १९ लसीचे दोन डोस पूर्ण झालेले असणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार महापालिकेच्या कार्यालयात येणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह सर्व अभ्यागतांना कोविड लसीचे दोन डोस पूर्ण असल्याचे प्रमाणपत्र प्रवेशद्वारावर पडताळणी करूनच प्रवेश देण्यात यावा, असे आदेश आयुक्त गणेश देशमुख यांनी सुरक्षा विभागास दिले असून याची गांभीर्याने नोंद घेण्यास सांगितले आहे.



पनवेल : श्री संत ज्ञानेश्वर माऊली सेवा मंडळातर्फे आजिवली येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी या ठिकाणी भेट दिली. सोबत तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, अनेश ढवळे, योगेश लहाने, आप्पा भागीत, घनश्याम भागीत, नाना भागीत, नामदेव गाताडे, अशोक गायकवाड, गोविंद पाटील आदी उपस्थित होते.

## भाजप कामगार आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी संजय पवार




**पनवेल : वार्ताहर**

देशविदेशातील लाखो कामगारांसाठी मदत आणि हजारो आंदोलनामधून त्यांच्या न्याय्यहक्कासाठी लढा देणारे संजय वासुदेव पवार यांची नियुक्ती भाजप कामगार आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी करण्यात आली. ही नियुक्ती पालक संजय केणेकर आणि प्रदेश अध्यक्ष गणेश ताठे यांनी केली.

संजय पवार हे सतत कामगार आणि मच्छीमारांचा प्रश्न आणि समस्यांसाठी त्यांना न्याय मिळवून देत असतात. विदेशात अडकलेल्या अनेक मजुरांना ते भारतात आणावयास मदतदेखील करतात. मिळालेली नवीन जवाबदारी संजय पवार नक्कीच योग्यपणे पार पडतील, अशी खात्री समस्त कामगार वर्गात आहे. या नियुक्तीबद्दल त्यांचे अनेक सामाजिक संस्था आणि कामगार वर्गाकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## पेणमध्ये इमारतीवरून पडून मुलाचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील कुंभार आळी येथील सद्गुरू पार्क को-ऑप. हौ. सोसायटी बिल्डिंगमधील १२ वर्षीय साईश विशाल नाईक याचा इमारतीच्या टेरेसवरून पडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. इमारतीच्या टेरेसवरून पडल्यानंतर साईश याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. या वेळी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

या घटनेची नोंद पेण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक मीनल शिंदे या करीत आहेत. साईश याच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



पनवेल : भाजप युवा कार्यकर्ते सागर भोपी यांनी वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप सोशल मीडिया सेल तालुका अध्यक्ष राजेश पाटील, युवा नेते प्रमोद भगत, दिवेश भगत उपस्थित होते.

## उरणमधील साहित्यिकांची अलिबागेत सहल

**चिरनेर :** येथील काव्य दरबार व आचार्य अत्रे कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन वर्षाचे औचित्य साधून अलिबाग येथे सहलीचे आयोजन करण्यात आले होते. भेंडखळचे कवी, गायक, संगीतकार प्रकाश ठाकूर यांच्या अलिबाग येथील फार्महाऊसवर हा कार्यक्रम झाला.

नवोदित कवी भगवान ठाकूर यांच्या 'भक्तीतून मुक्ती' या पहिल्या कविता संग्रहाचे वाचन करून कौतुक करण्यात आले. या वेळी काव्य दरबारचे अध्यक्ष प्रकाश ठाकूर, आचार्य अत्रे कट्टाचे अध्यक्ष धनंजय गोंधळी, ज्येष्ठ कवी हरिश्चंद्र मढवी, प्रकाश ठाकूर, ज्येष्ठ साहित्यिक हरिभाऊ घरत, भगवान ठाकूर उपस्थित होते. या सर्व कवींनी साहित्य व कवितेचे छंद या विषयावर मार्गदर्शन केले.



पनवेल : भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे यांनी बूथ अध्यक्ष संतोष ढगे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सोबत शहर सरचिटणीस अमरिश मोकल व अन्य.

## आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा आदर्श समोर ठेवून पत्रकारांनी काम करावे -मनोज सानप

**अलिबाग : प्रतिनिधी**

देशात परकीय सत्ता असताना मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी वृत्तपत्र सुरू करून समाजाला दिशा देण्याचे काम केले. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांनी लोककल्याणाचे काम केले. त्यांचा आदर्श समोर ठेवून पत्रकारांनी काम करावे, असे प्रतिपादन रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी गुरुवारी (दि. ६) येथे केले.




रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने गुरुवारी (दि. ६) सकाळी येथील रामनारायण पत्रकार भवन येथे पत्रकार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्या वेळी सानप बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, तर प्रमुख मान्यवर म्हणून रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष रमेश कांबळे, ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर व्यासपीठावर उपस्थित होते.

रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी नारायण मेकडे, नवीनचंद्र सोष्टे, संतोष पवार, राजू भिसे आदी दिवंगत पत्रकारांना श्रद्धांजली वाहण्यात आली. भारत रांजणकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## पनवेल मनपाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त चर्चासत्र

**पनवेल : प्रतिनिधी**

स्वातंत्र मिळविताना जनजागृती करण्यासाठी त्या काळात महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेकांनी विविध वृत्तपत्राचे संपादन केले. स्वातंत्र्योत्तर काळात नव्या जगाचे चित्रण करणारी पत्रकारिता सुरू झाली. खेळ, महिला, क्राईम अशा वेगवेगळ्या विषयांचा समावेश पत्रकारितेमध्ये होऊ लागला. तंत्रज्ञान जसे बदलत गेले तसे बातम्यांचे विषयही बदलत गेले. अशाप्रकारे स्वातंत्र्य पूर्व ते आतापर्यंतच्या पत्रकारितेमधील विविध टप्प्यांचा प्रवास साम वाहिनीचे संपादक प्रसन्न जोशी यांनी पनवेल महानगरपालिकेतर्फे झालेल्या चर्चासत्रात मांडला.




पनवेल महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागांतर्गत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या संकल्पनेतून पत्रकार दिनाच्या निमित्ताने 'स्वतंत्र भारताच्या ७५ वर्षांमधील जडणघडणीतील पत्रकारितेची भूमिका' या विषयावर ऑनलाईन चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रसन्न जोशी बोलत होते. या वेळी पनवेल महापालिका क्षेत्रातील पत्रकारांनीही आपले विचार मांडले. या चर्चासत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पत्रकारांनी सहभाग घेतला. या वेळी उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाचे प्रमुख कांतीलाल पाडवी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, लिपिक प्रफुल्ल घरत यांनी सहकार्य केले.

पान १ वरून

## दिवाळी अंकांतून साहित्य घडविण्याचे काम

रामदास फुटाणे यांनी पुढे बोलताना, पुस्तकातून आत्मसंवाद आणि त्यातून निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते. त्यामुळे इंग्रजी ज्ञानभाषा असली, तरी निर्णयक्षमता मातृभाषेत आहे. मराठी महाराष्ट्राची राजभाषा असताना महाराष्ट्रातील अनेक मंत्री प्रसारमाध्यमांना मराठीत बाईट दिल्यानंतर पुन्हा हिंदी भाषेत त्याचे रूपांतर करीत बाईट देतात. हा अवघड प्रश्नच असून मराठीच्या मारेकऱ्यांचा शोध लावला पाहिजे, असे आपल्या शैलीत सांगत मराठीला स्वतःहून सन्मान दिला पाहिजे, असे अधोरेखित केले.

या वेळी रामदास फुटाणे यांनी कोरोना व इतर विषयांवर कविता सादर करीत अदृश्य कोरोनाने जगण्याचे भान दिले असल्याचे आवर्जून नमूद केले. राज्यातील कानाकोपऱ्यातून दिवाळी अंक या स्पर्धेसाठी येतात ही अभिनंदनीय बाब आहे, असे सांगतानाच ही स्पर्धा एक उत्तम व्यासपीठ असल्याचे त्यांनी म्हटले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे समाजसेवा, शिक्षणसेवा, सांस्कृतिक सेवा असे विविध गुण आहेत. एकाच व्यक्तीत एवढे कर्तृत्व आणि दातृत्व असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर एकमेव असतील, असे गौरवोद्गार काढत हे आदर्श व्यक्तिमत्त्व मलासुद्धा प्रेरणा देते, असेही त्यांनी दिलखुलासपणे सांगितले.

राज्यस्तरीय सन २०१८च्या स्पर्धेत प्रथम क्रमांक 'अधोरेखित' दिवाळी अंकाने, द्वितीय 'चतुरंग अन्वय', तृतीय 'झपूर्झा', सर्वोत्कृष्ट बाल दिवाळी अंक 'वयम', उत्कृष्ट विशेषांक 'अॅग्रोवन', उत्कृष्ट कथा 'चंद्रकांत', उत्कृष्ट व्यंगचित्र 'हास्यधमाल', उत्कृष्ट मुखपृष्ठ 'दीपावली'; सन २०१९च्या स्पर्धेत प्रथम क्रमांक 'शाश्वत वनीकरण' आणि 'उद्याचा मराठवाडा', द्वितीय (विभागून) 'दीपावली' आणि 'पुरुष उवाच', तृतीय क्रमांक (विभागून) 'दुर्ग-शोध गडकिल्ल्यांचा' आणि 'दुर्गाच्या देशातून', उत्कृष्ट विशेषांक 'समपथिक', उत्कृष्ट कविता 'खोडलेली कविता-कालनिर्णय', उत्कृष्ट व्यंगचित्र 'दीपावली', उत्कृष्ट मुखपृष्ठ 'चतुरंग अन्वय', उत्कृष्ट अंतर्गत सजावट 'अक्षरधारा'; तर सन २०२०च्या स्पर्धेत 'अनलॉक' आणि 'लोकदीप' या अंकांनी विभागून प्रथम क्रमांक, 'संवादसेतू' व 'आंतर-भारती' या अंकांनी विभागून द्वितीय क्रमांक, 'कुबेर' व 'ओंजळीतील अक्षरे' या अंकांनी विभागून तृतीय क्रमांक, सर्वोत्कृष्ट बाल दिवाळी अंक 'छावा', उत्कृष्ट विशेषांक 'तेजोमय', उत्कृष्ट कथा 'पॉपी टिअर (व्यासपीठ)', उत्कृष्ट कविता-सकाळ ('खरवडून पाहीन म्हणते'), उत्कृष्ट व्यंगचित्र 'आक्रोश (संजय मिस्त्री)', उत्कृष्ट मुखपृष्ठ 'दीपावली' व उत्कृष्ट अंतर्गत सजावटीचे पारितोषिक 'किल्ला' या अंकाने पटकाविला.

रायगड जिल्हास्तरीय २०१८च्या स्पर्धेत प्रथम क्रमांक 'साहित्यआभा' अंकाने, द्वितीय 'लोकसेवक', तृतीय 'उरण समाचार'; सन २०१९च्या स्पर्धेत प्रथम क्रमांक 'पर्ण', द्वितीय 'उरण समाचार', तृतीय 'वादळवारा'; तर सन २०२०च्या स्पर्धेत 'आगरी दर्पण'ने प्रथम, 'इंद्रधनु'ने द्वितीय आणि 'रामप्रहर' अंकाने तृतीय क्रमांक पटकाविला. त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये, अरविंद कुलकर्णी, प्रा. डॉ. दीपा ठाणेकर, महेश कुलसंगे, प्रा. नम्रता पाटील, सुनील कर्णिक, प्रा. डॉ. अलका मटकर, प्रा. जयप्रकाश लब्दे, विजय कुलकर्णी, प्रा. वर्षा माळवदे, नम्रता कडू, रामदास खरे, प्रतिष्ठा सोनटक्के यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक म्हात्रे यांनी, तर परीक्षक मनोगत नीला उपाध्ये यांनी व्यक्त केले. या वेळी आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी अंकाच्या प्रदर्शनाचा लाभ साहित्यप्रेमींनी घेतला, तसेच दिवाळी अंक स्पर्धेसंदर्भात मल्हार टीव्हीच्या माध्यमातून सादर झालेल्या डॉक्युमेन्ट्रीचे उपस्थित मान्यवर व साहित्यप्रेमींनी कौतुक केले.

### पुढच्या वर्षीपासून सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकांच्या बक्षीस रकमेत भरघोस वाढ

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिले साहित्यप्रेमींना बळ

भरघोस पारितोषिक असलेली ही सर्वांत मोठी दिवाळी अंक स्पर्धा... राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाला ७५ हजार रुपये आणि जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक ३० हजार रुपये असे स्वरूप... लोकनेते रामशेठ ठाकूर भाषणाला उभे राहिले... त्यांनी पुढच्या वर्षीपासून राज्यस्तरीय प्रथम क्रमांकासाठी थेट एक लाख रुपये, तर जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकासाठी ५० हजार रुपयांचे बक्षीस देण्याचे जाहीर केले आणि पुढील क्षणी टाळ्यांच्या कडकडाटात सर्व साहित्यिक, कवी, लेखक, निर्माते, साहित्यप्रेमींनी लोकनेते ठाकूर यांच्याप्रती आभार व्यक्त केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर एवढ्यावरच थांबले नाहीत, तर प्रथम दिवाळी अंकाचे प्रणेते का. घ. मित्र यांच्या जीवनावर साहित्यविश्वात एकही पुस्तक अद्यापपर्यंत अस्तित्वात आले नाही याची खंत या कार्यक्रमात रविप्रकाश कुलकर्णी यांनी व्यक्त केली होती. त्यावर बोलताना तुम्ही पुस्तकाच्या निर्मितीच्या कामाला लागा. मी का. घ. मित्र यांचे चरित्र पुस्तकरूपी प्रसिद्ध करण्यासाठी सर्वतोपरी मदत करेन, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जाहीर करीत त्यांना आश्वस्थ केले. त्यामुळे या समारंभात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी साहित्यप्रेमींच्या भावना जपत त्यांना बळ देण्याचे काम केल्याची प्रतिक्रिया साहित्यप्रेमींनी व्यक्त केली.

**राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा पारितोषिक**

प्रथम क्रमांक : ७५ हजार रुपये व सन्मानचिन्ह
द्वितीय क्रमांक : ३५ हजार रुपये व सन्मानचिन्ह
ततीय क्रमांक : २० हजार रुपये व सन्मानचिन्ह
उत्कष्ट कथा : ७ हजार रुपये
उत्कष्ट कविता : २५०० रुपये
उत्कष्ट व्यंगचित्र : २५०० रुपये
उत्कृष्ट विशेषांक : ५ हजार रुपये,
उत्कृष्ठ मुखपृष्ठ : ५ हजार रुपये,
सर्वोत्कृष्ट बालसाहित्य : ७५०० रुपये

**रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा पारितोषिक**

प्रथम क्रमांक : ३० हजार रुपये व सन्मानचिन्ह
द्वितीय क्रमांक : १५ हजार रुपये व सन्मानचिन्ह
तृतीय क्रमांक : ७५०० रुपये व सन्मानचिन्ह

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000021876** **Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-61/2021-2022.** RFx e-tender for work of providing and fixing of sheet moulding compound trench cover chequered plate for indoor application at 100kV Thal Substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 11,78,129/-, EMD amount Rs. 11,781/-** |
| 2 | Online Downloading the RFx . | **06.01.2022, 17:00 Hrs. to 13.01.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 13.01.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **14.01.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

# तीन कोरोना केअर सेंटर खुली

## सध्या ऑक्सिजनची गरज नसल्याने दिलासा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात कोरोना रुग्ण सापडल्याने नवी मुंबई महापालिका प्रशासनाने तातडीने आरोग्य व्यवस्था खुली करण्यास सुरुवात केली आहे. तीन मोठी कोरोना काळजी केंद्र खुली केली आहेत. उपचाराधीन रुग्ण वाढल्याने बंद केंद्र खुली करावी लागत असून पुढील काळात गरजेनुसार आरोग्य व्यवस्थेत वाढ करण्यात येणार आहे.

पहिल्या लाटेत कोरोना काळजी केंद्र बंद करून तेथील आरोग्य व्यवस्था हलवण्यात आल्याने दुसऱ्या लाटेत रग्णवाढीनंतर प्रचंड गैरसोय झाली होती. हा अनुभव पाठीशी असल्याने दुसरी लाट ओसरल्यानंतर प्रशासनाने १४ काळजी केंद्र बंद केली, मात्र तेथील आरोग्य व्यवस्था कायम ठेवली होती. त्यामुळे आता रुग्णवाढीनंतर तत्काळ आरोग्य व्यवस्था खुली करता येत आहे.

निर्यात भवन, राधास्वामी सत्संग भवन, महिला कोरोना रुग्णांसाठी ईटीसी केंद्र आजपासून सुरू करण्यात आले आहेत. गुरुवारपासून बेलापूर येथील मयूरेश्वर येथील कोरोना काळजी केंद्र सुरू करण्यात येणार आहे. शहरात मोठ्या प्रमाणात कोरोना चाचण्या करण्यात येत असताना वाढणारी रुग्णसंख्याही चिंताजनक आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत १४४१ दैनंदिन रुग्ण ही सर्वोच्च रुग्णसंख्या होती. ती आता आठ दिवसांतच १३०० पेक्षा अधिक झाली असून आतापर्यंतची १४४१ ही रुग्णसंख्या एक-दोन दिवसात गाठू शकते.



मंगळवारी १०७२; तर बुधवारी १३०० पेक्षा अधिक रुग्ण असा दैनंदिन रुग्णांच्या वाढीचा वेग प्रचंड असल्याने शहरात उपचाराधीन रुग्ण तेवढ्याच वेगाने वाढत आहेत. त्यामुळे आता आरोग्य व्यवस्थेची गरज भासणार आहे. त्यानुसार ही व्यवस्था वाढवण्यात येणार आहे. नव्याने वाढत असलेले बहुतांश रुग्ण हे तीव्र व मध्यम लक्षणे नसलेले आहेत. त्यामुळे दुसऱ्या लाटेत प्राणवायू खाटा व प्राणवायूचा तुटवडा निर्माण झाला होता. त्याची गैरसोय या वेळी होणार नाही. पालिका प्रशासनाने त्याची व्यवस्था केलेली आहे, मात्र सध्या प्राणवायूची गरज असलेले रुग्ण हे अल्प आहेत.

वाशी येथील सिडको प्रदर्शन कोरोना रुग्णालयात बुधवारी दुपारपर्यंत ९०० कोरोनाबाधित दाखल असताना त्यातील फक्त चार जणांना प्राणवायू खाटांची आवश्यकता लागली असल्याचे या रुग्णालयाचे प्रमुख डॉ. वसंत माने यांनी सांगितले. शहरात उपचाराधीन रुग्णसंख्याही काही दिवसांतच चार हजारांपर्यंत गेली आहे. हा वेग असाच राहिला तर १० हजारांपर्यंत उपचाराधीन रुग्ण होऊ शकतात. त्यामुळे साध्या खाटांची मोठी गरज लागणार आहे.

### रुग्णांची दोन भागांत विभागणी

**शहरात समूह संसर्ग अधिक वेगाने वाढत असून दररोज रुग्णसंख्या वेगात वाढत आहे. त्यातच लक्षणे असलेले रुग्ण, लक्षणेविरहित रुग्ण अशी विभागणी पालिकेने केली असून सौम्य लक्षणे असणाऱ्यांना शक्यतो घरीच ठेवण्याचा प्रयत्न आहे. ज्येष्ठ नागरिक, त्यातच इतर आजार असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना रुग्णालयात दाखल करण्यासाठी पालिकेने नियोजन केले आहे.**

**“दैनंदिन रुग्णसंख्या चार ते पाच हजारांपर्यंत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, पण रुग्णांना प्राणवायू खाटांची गरज लागत नाही हे दिलासादायक आहे.**

**-अभिजीत बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

पुढील १० ते १५ दिवस अत्यंत जोखमीचे ठरणार आहेत.

नवी मुंबईत दैनंदिन रुग्णसंख्या व उपचाराधीन रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून काही दिवसांतच दुसऱ्या लाटेतील सर्वोच्च रुग्णसंख्येपर्यंत आपण आलो आहोत. दैनंदिन रुग्णसंख्या चार ते पाच हजारांपर्यंत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. पालिका दैनंदिन व्यवस्था व आगामी काळात होणारी प्रचंड रुग्णवाढ याकडे लक्ष ठेऊन आहे, पण रुग्णांना प्राणवायू खाटांची गरज लागत नाही, हे दिलासादायक आहे.

# केगाव-आवेडा अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील केगाव-आवेडा येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण आमदार महेश बालदी यांच्या सहकार्याने गुरुवारी (दि. ६) पूर्ण करण्यात आले.

या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, उपनगराध्यक्ष जयवीन कोळी, मानव अधिकार संस्था तालुका अध्यक्ष अरविंद पवार, उपाध्यक्ष उदय म्हात्रे, रोहित पाटील, केगाव भाजप महिला आघाडी अध्यक्ष आरती अशोक पाटील, प्रेरणा पाटील, ग्रामपंचायत सदस्य अविनाश पाटील, विनेश पाटील, राजेंद्र म्हात्रे, अक्षय पाटील, मिथुन पुरव यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



# वासांबेत आदिवासी वाड्यांवर जात प्रमाणपत्र वाटप शिबिर



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कोविड विषाणूचा संसर्ग वाढू नये याकरिता प्रत्येक वाडीवर जाऊन जात दाखल्यासाठी फॉर्म्स भरून घेण्यात आले होते. त्याअंतर्गत वासांबे तलाठी सजातील वाड्यांवर शिवनगरवाडी, पानशीलवाडी, खोंड्याचीवाडी, रीसवाडी कातकरीवाडी, शिंदी वाडी, मोहोपाडावाडी, पराडे वाडी या ठिकाणी फॉर्म्स भरून घेण्यात आले.

रसायनी परिसरातील वासांबे मोहोपाडा ही तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेली ग्रुप ग्रामपंचायत आहे. कोविड विषाणूचा संसर्ग वाढत असल्याने जातीचे दाखले काढण्यासाठी एकत्रितपणे बोलावून शिबिर घेणे शक्य नसल्याने हा प्रयोग करण्यात आला. उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, तहसीलदार अयुब तांबोळी, नायब तहसीलदार कल्याणी मोहिते, मंडळ अधिकारी किरण पाटील, तलाठी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर घेण्यात आले. या वेळी आदिवासी लाभार्थींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# वाढदिवसानिमित्त नगरसेविका चारुशीला घरत यांचे आवाहन



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेच्या माजी उपमहापौर व विद्यमान नगरसेविका चारुशीला घरत यांचा शुक्रवारी (दि. ७) वाढदिवस आहे, परंतु कोरोनाच्या वाढत्या प्रादूर्भावामुळे त्या आपला वाढदिवस साजरा करणार नाहीत. त्यामुळे शुभेच्छा देण्यासाठी कुणीही घरी येऊ नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

वाढदिवसानिमित्त चारुशीला घरत यांनी आधार कार्ड, आरोग्य व नेत्रचिकित्सा शिबिर आयोजित केले होते, मात्र कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे हे उपक्रम तूर्त स्थगित करण्यात आले आहेत. ते आगामी काळात घेण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.



**पनवेल : येथील जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व नगरसेवक नितीन पाटील यांच्या वतीने वनवासी कल्याण आश्रमाच्या दिनदर्शिका व भाजपतर्फे कापडी पिशवीचे वाटप पनवेल एचओसी कॉलनी येथील आदिवासी वाडीत करण्यात आले.**

# मोहोपाड्यात रेझिंग डे सप्ताह; पथनाट्यातून जनजागृती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा बाजारपेठेत २ ते ८ जानेवारीदरम्यान रेझिंग डे सप्ताहनिमित्त ऑन ड्युटी चोवीस तास या पथनाट्यातून पोलीस विभागाच्या कार्याची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी याबाबत जनजागृती करण्यात आली.



(छाया : राकेश खराडे)

पोलीस काका, पोलीस दिदी, ११२ हेल्पलाईन, बीट मार्शल, दामिनी पथक, पोलीस मित्र याविषयी जनतेला माहिती व्हावी. सायबर क्राईम होऊ नये यासाठी कोणती दक्षता घ्यावी याविषयी मोहोपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जनजागृती करण्यात आली. या वेळी रसायनी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक विनोद वायंगणकर, नाईक विशाल झावरे आदींसह पोलीस बँड पथक उपस्थित होते.

पथनाट्याचे नेतृत्व राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तथा प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्ष तपस्वी नंदकुमार गोंधळी या करीत असून पथनाट्यात कलाकार म्हणून विनोद नाईक, अमृता शेडगे, प्रसाद अमृते, सागर पाटील, तुषार राऊळ, धनश्री मोरे, निशिता पाटील, मानसी पाटील, मानसी पोसरेकर, श्रीराम जांभळे आदी कलाकार सहभागी झाले होते. पथनाट्यातून रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये जनजागृती करण्यात येणार असल्याचे तपस्वी गोंधळी यांनी या वेळी बोलताना सांगितले.

# उरण महाविद्यालयात वनवासी संस्कृती दर्शन कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग व वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने वनवासी संस्कृती दर्शन या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.



प्रा. एच. के. जगताप यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रमाचा उद्देश सांगितला, तर पाहुण्याचा परिचय प्रा. डॉ. पी. आर. कारूळकर यांनी केला व प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड व के. ए. शामा यांच्या हस्ते पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमात उदय टिळक यांनी आदिवासी व वनवासी संस्कृतीचा इतिहास सांगून त्यांची वाटचाल सांगितली. मीरा पाटील यांनी आदिवासीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या सवयी, प्रथा, परंपरा, दैवत याविषयी माहिती सांगितली.

या वेळी आदिवासींनी आदिवासी नृत्य सादर केले व आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविले. आलिया शेख, ईकरा मुकरी व प्रचिती माळी या विद्यार्थिनींनी उत्फूर्तपणे आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रमुख पाहुणे क्षेत्र समन्वयक डॉ. बी. एस. पाटील (सीकेटी महाविद्यालय, पनवेल) यांनी पर्यावरण रक्षणात आदिवासीचे योगदान व भूमिका किती महत्त्वाची आहे याविषयी माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्ही. एस. इंदूलकर यांनी केले, तर आभार प्रा. हन्नत मॅडम यांनी मानले. या वेळ रवींद्र पाटील, गंगुताई कातकरी, विश्वनाथ नाईक, मुक्ताताई कातकरी, पार्वतीताई कातकरी, बेबीताई कातकरी, अनंता कातकरी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात एकूण ७८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

# पत्रकार दिनानिमित्त पत्रकार मंचतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पत्रकार दिनाच्या निमित्ताने आणि ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने पनवेल तालुका पत्रकार विकास मंचने पनवेल तालुक्यातील भोकरपाडा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे आणि खाऊचे वाटप केले, तसेच गेल्या दोन शैक्षणिक वर्षांत नैपुण्य प्राप्त केलेल्या मंचातील सदस्यांच्या मुलांचा सन्मान करण्यात आला.

मराठी वृत्तपत्र क्षेत्राचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला. मंचाचे सरचिटणीस मंदार दोंदे यांनी प्रास्ताविक सादर केले. या वेळी जिल्हा परिषद शाळेतील मुलांना वह्या, पेन असे शैक्षणिक साहित्य तसेच टूथपेस्ट, टूथब्रश, मास्क असे स्वच्छता किट आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

कोरोना संदर्भातील नियमांचे पालन करून भोकरपाडा येथे झालेल्या या कार्यक्रमाला अध्यक्ष माधव पाटील, सरचिटणीस मंदार दोंदे, उपाध्यक्ष हरेश साठे, खजिनदार नितिन फडकर, विवेक मोरेश्वर पाटील, संजय कदम, अविनाश कोळी, अनिल कुरघोडे, अनिल भोळे, राजेंद्र पाटील, राजू गाडे, प्रवीण मोहोकर, मयूर तांबडे, भरत कुमार कांबळे, सुनील राठोड, स्वर्गीय बाबू हशा पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय पाटील, खजिनदार रूपेश फुलोरे, कल्पेश फुलोरे, हनुमान फुलोरे, किशोर फुलोरे, शिक्षिका समृद्धी सुधीर पाटील, प्रकाश राजगे आदी उपस्थित होते. प्रवीण मोहोकार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करून कार्यक्रम साजरा करण्यात आला.



# उरणमध्ये पत्रकारांचा सन्मान



**उरण : वार्ताहर**

येथील स्व. रमेश का. डाऊर सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याचे आयोजन प्रतिष्ठानचे संस्थापक तथा सामाजिक कार्यकर्ते सचिन रमेश डाऊर यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दै. वादळवाराचे संस्थापक दा. चां. कडू होते.

प्रिंट व इलेट्रॉनिक्स मीडिया पत्रकारांना डाऊर कुटुंबाच्या वतीने सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी वादळवारा वृत्तपत्राचे संस्थापक दा. चां. कडू, पत्रकार स्व. रमेश का. डाऊर सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक तथा सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर, पत्रकार प्रदीप पाटील, संजय गायकवाड, दिलीप कडू, अजित पाटील, वीरेश मोडखरकर, राजा कडू, विशाल गाडे, आनंद नारंगीकर, दिनेश पवार, विठ्ठल मामताबादे, सुयोग गायकवाड, विशाल गाडे, आशिष पाटील, पूजा चव्हाण, डॉ. सत्या ठाकरे, मीनल पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार प्रदीप पाटील यांनी केले.

# संकल्प फाऊंडेशनतर्फे पनवेलमध्ये पत्रकारांचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, ‘दर्पण’कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त कामोठे येथील संकल्प फाऊंडेशनच्या वतीने उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या पत्रकारांचा गुरुवारी (दि. ६) पत्रकार दिनी सत्कार करण्यात आला.

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून कार्यरत असताना पत्रकारांचे समाजातील योगदान मोलाचे आहे. याचीच दखल घेत कामोठे येथील संकल्प फाऊंडेशनच्या वतीने पनवेल महापालिका मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार व सा. पनवेल टाईम्सचे संपादक गणेश कोळी, दै. रामप्रहरचे वृत्तसंपादक समाधान पाटील, दै. नवराष्ट्रचे प्रतिनिधी प्रशांत शेडगे, सा. स्टार पनवेलचे संपादक अनिल राय, ‘रामप्रहर’चे छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर यांना उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास संकल्प फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्ष वैशाली जगदाळे, सचिव कलापी जाधव, भाजप सोशल मीडिया पनवेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी आदी उपस्थित होते. उपस्थितांनी पत्रकारांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.



## संपादकीय

# सारे काही सत्तेसाठी

सत्तेवाचून तडफडणाऱ्या काँग्रेसची अवस्था पाण्याबाहेर काढलेल्या माशाप्रमाणे झाली आहे. तर याच सत्तेपायी महाविकास आघाडी सरकारमधील तिन्ही पक्षांची अवस्था उतावीळ झालेली स्पष्ट दिसते आहे. पंजाबमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षा व्यवस्थेतील कथित गोंधळाची जबाबदारी झटकण्यासाठी तेथील काँग्रेस सरकार जे काही प्रयत्न करीत आहे, त्यास केविलवाणे हे एकमेव विशेषण उचित ठरावे. सत्ता हातात आल्यानंतर कसे वागू नये याची जणू उदाहरणेच पंजाबातील काँग्रेस सरकार आणि महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार घालून देत आहे.

**सत्तासुंदरीसारखी महामाया जगात शोधून सापडणार नाही. या सत्तासुंदरीपायी काँग्रेससह भल्याभल्या पक्षांचे पतन झालेले आपण पाहतोच आहोत. पंतप्रधान मोदी यांच्या सुरक्षाव्यवस्थेतील घोडचूक नेमकी कोणाची? ही खरोखर घोडचूक होती की कारस्थान? देशाच्या पंतप्रधानांचा जीव धोक्यात घालण्यापर्यंत टोकाची भूमिका घेणे योग्य आहे का, या साऱ्या प्रश्नांची उत्तरे चौकशीअंती बाहेर पडतीलच. तथापि या एकूण दुर्दैवी प्रकाराबाबत काँग्रेसने जे राजकारण सुरू केले आहे, ते संतापजनक आहे. महाराष्ट्रातील काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी मोदी यांच्या सुरक्षाव्यवस्थेबाबत घडलेल्या घटनेबद्दल खालच्या पातळीवर जाऊन शेरेबाजी केली. मोदी आणि भारतीय जनता पक्षाची ही नौटंकी असल्याचे अत्यंत निषेधार्ह असे उद्‌गार त्यांनी काढले. आपण कुणाबाबत असली विधाने करीत आहोत याचेही भान त्यांना उरले नाही. पटोले यांच्यासारखे अर्ध्या हळकुंडात पिवळे झालेले अनेक नेते त्यांच्या पक्षामध्ये आहेत. वास्तविक या संपूर्ण प्रकरणात पंजाबातील काँग्रेस सरकारची जबाबदारी अंतिम होती व उत्तरदायित्व त्यांच्याकडेच जाते. पंतप्रधानांच्या सुरक्षा व्यवस्थेतील गफलतीबद्दल त्यांनी खरेतर संपूर्ण देशाची माफी मागायला हवी. ते राहिले दूरच. उलटपक्षी गलिच्छ पातळीवरील राजकारण करण्यात मात्र विरोधी पक्षांचे नेते मश्गुल आहेत. काँग्रेससह महाविकास आघाडीचे महाराष्ट्रामध्ये जे काही चालू आहे ते जनता उघड्या डोळ्यांनी पाहात आहे. इतके घाबरट आणि पळपुटे सरकार इतिहासात तरी पाहिले नाही अशी टीका विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच केली. त्यात शतप्रतिशत तथ्य दिसते. फडणवीस यांनी महाविकास आघाडीच्या कारभाराचे यथेच्छ वाभाडे काढले आणि त्यांच्या गेल्या दोन वर्षातील नाकर्तेपणाचा पाढाच वाचला. त्याच दिवशी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या कामाला लागा, असा ऑनलाइन सल्ला दिला. टीकेला उत्तर देण्यापेक्षा शिवसेनेला घराघरात पोचवा आणि आपल्या सरकारच्या कामांची माहिती करून द्या, असा आदेश मुख्यमंत्र्यांनी कार्यकर्त्यांना दिला असल्याचे समजते. कार्यकर्त्यांसाठी हे मोठे कठीण काम म्हटले पाहिजे! कारण गेल्या दोन वर्षांमध्ये ठाकरे सरकारने जनतेची नेमकी काय कामे केली हे सांगता येणे खरोखर अशक्य आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीपासून वादळग्रस्त व पूरग्रस्तांच्या मदतीपर्यंत आणि शिक्षणाला मुकलेल्या विद्यार्थीवर्गापासून उपाशीपोटी तडफडणाऱ्या एसटी कामगारांपर्यंत सर्वांनाच महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणाचा झटका बसला आहे. स्वतःच्या न केलेल्या कामाचा टेंभा मिरवणे अशक्य झाल्यानेच पंतप्रधान मोदी यांच्यासारख्या प्रचंड नेतृत्वावर चिखलफेक करण्याचा खटाटोप महाविकास आघाडी सरकारचे नेते करताना दिसतात. त्यांच्या या मानसिकतेमध्येच त्यांच्या अपयशाची गुपिते दडलेली आहेत. खालच्या पातळीवरील राजकारण बंद करून आता तरी हे सरकार कामाला लागेल ही अपेक्षा ठेवण्यातही अर्थ उरलेला नाही.**

# रायगड जिल्ह्यातील जमिनी लाटण्याचा डाव



रायगड जिल्ह्यात मोठमोठाले प्रकल्प येत आहेत. त्यासाठी जमिनी संपादित करण्याचे काम सुरू आहे. नवीन प्रकल्पाच्या नावाखाली जमिनी घेतल्या जात आहेत, परंतु यापूर्वी औद्योगिक कारणांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या, मात्र त्यापैकी अनेक ठिकाणी कोणत्याही प्रकारचे उद्योग सुरू करण्यात आलेले नाहीत. शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनी घेऊन त्या पड ठेवण्यात आल्या आहेत. हेच 'उद्योग' सुरू आहेत. प्रकल्पांच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी लाटण्याचा हा डाव आहे. विकासकामांना विरोध करण्याचे कारण नाही, परंतु ज्या जमिनी घेण्यात आल्या आहेत, त्यावर प्रकल्प होणार नसेल तर त्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळाण्यासाठी आवाज उठवलाच पाहिजे.

गेल्या २० वर्षात रायगड जिल्ह्यातील भातशेतीखालील क्षेत्रात शहरीकरण व अन्य प्रकल्प इत्यादी कारणांमुळे ३९ हजार २६४ हेक्टर म्हणजे ९८ हजार १६० एकर एवढी प्रचंड घट झाली आहे, तसेच जिल्ह्यात आता जे जमीन संपादन सुरू आहे, त्यामुळे एकाच वर्षात ५२ हजार ६२ एकर क्षेत्र शेतीकडून अन्य कारणासाठी वळवले जात आहे. म्हणजेच एक लाख एकर शेतजमीन मारण्यात आली. आतादेखील ५२०६२ एकर जमीन मारण्यात येत आहे. ही रोजगारांची, उपजीविकेची व पर्यावरणाची प्रचंड हानी आहे. त्या तुलनेत नवीन रोजगारनिर्मिती होताना दिसत नाही. प्रत्येक प्रकल्पासाठी जमीन घेताना रोजगार निर्मितीचे फक्त गाजर दाखवले जाते, पण प्रत्यक्षात तसे घडत नाही.

भूमी संपादन कायद्याच्या (२०१३) कलम १० नुसार जिल्ह्यांमध्ये संपादनाखालील क्षेत्र विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे असता कामा नये, मात्र हा मुद्दाच संपादनाच्या अधिसूचना काढताना विचारात घेतलेला नाही. 'भाताचे कोठार' ही रायगड जिल्ह्याची ओळखच पुसून टाकण्याच्या दिशेने व इथला शेतकरी वर्गच संपविण्याच्या दिशेने सरकारची पावले पडताना दिसत आहेत. हे भूमी संपादन कायदा २०१३ च्या कलम १०चे उल्लंघनदेखील आहे. भूसंपादन कायदा २०१३ नुसारच सदर जमीन संपादन झाले पाहिजे, ज्यात प्रकल्प नाकारण्याचा अधिकार प्रकल्पबाधितांना आहे, पण तो कायदा गुंडाळून ठेवून शासन सदर जमीन संपादन करत आहे.



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

फार्मा पार्क हा केमिकल प्रकल्प आहे व इको सेन्सिटिव्ह झोनच्या, तसेच फणसाड अभयारण्याला लागून आहे. विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर हा १२९७५ कोटींचा प्रकल्प असून त्याचा स्थानिक जनतेला कसलाही फायदा नाही. उलट त्यांचे जगणे धोक्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याचे कंत्राट देण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांना फायदा मिळावा, यासाठी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जात आहेत.

जेएसडब्ल्यू या कंपनीने प्रदूषण व खारे पाणी जमिनीत घुसवल्याने आतापर्यंत शेकडो एकर जमिनी नासवल्या आहेत, तसेच मोठ्या प्रमाणात जमीन, पाणी व हवेचे प्रदूषण चालविले आहे. ज्यावर सरकार आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कसलेही नियंत्रण नाही.

झोनल ॲटलस फॉर साइटिंग इंडस्ट्रीज या अहवालात रायगड जिल्ह्यातील वाढत्या प्रदूषणाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली असून आणखी प्रदूषणकारी प्रकल्पांना मंजुरी देण्यात येऊ नये, अशी शिफारस करण्यात आली आहे. तीदेखील बाजूला ठेवून केमिकल प्रकल्प व महाकाय प्रकल्पांसाठी जमिनी घेणे सुरूच आहे. दुसऱ्या बाजूला वाढत्या तपमानाचा धोका व त्यामुळे येणारे पूर, अतिवृष्टी, दरडी कोसळणे या संकटांना सामान्य जनता वारंवार सामोरी जात आहे.

ते टाळण्यासाठी अनावश्यक औद्योगिकीकरण व विनाशकारी प्रकल्पांना आळा घालण्याची गरज आहे, मात्र त्याकडे व जागतिक इशाऱ्यांकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात आहे. रायगड जिल्ह्यात याआधी उद्योगांसाठी संपादित केलेल्या अनेक जमिनी पडून आहेत. त्या विकसित करण्याचे सोडून नव्याने शेतकरी व स्थानिक जनतेला बेरोजगार व उद्‌ध्वस्त केले जात आहे.

या सर्व प्रक्रियेत शेतकरी व सामान्य जनतेची फसवणूकच केली जात आहे, अशी भावना रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची बनत चालली आहे. त्यामुळे या प्रकल्पांना शेतकरी विरोध करीत आहेत. हे प्रकल्प नकोत व ते रद्दच करण्यात यावेत, अशी मागणी होऊ लागली आहे. हे प्रकल्प नकोत, यासाठी काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता.

यापूर्वी प्रकल्पांसाठी ज्यांच्या जमिनी घेण्यात आल्या आहेत, त्या शेतकऱ्यांना वाईट अनुभव आहे. एकतर त्यांना योग्य मोबदला मिळालेला नाही किंवा ज्या उद्देशासाठी जमिनी घेण्यात आल्या तेथे ते प्रकल्पच आले नाहीत. जमिनी पडून राहिल्या. जमीन गेली. त्याचा मोबदला नाही. जमीन नसल्यामुळे शेती करता येत नाही. त्यामुळे बेराजगारी वाढली. शेतकरी उद्‌ध्वस्त होत आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्या जाणार असतील, तर त्याला शेतकऱ्यांनी विरोध केलाच पाहिजे. विकासकामांना विरोध करण्याचे कारण नाही, परंतु ज्या प्रकल्पासाठी जमिनी घेण्यात आल्या आहेत. त्यासाठी जमिनींचा वापर न करता त्या वर्षानुवर्षे पड ठेवल्या जात असतील तर त्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळाल्याच पाहिजेत. त्यासाठी आवाज उठवलाच पाहिजे.

# कर्जतमध्ये कोरोना रुग्णांत झपाट्याने वाढ; प्रशासन सतर्क

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**


(छाया : संतोष पेरणे)

तालुक्यात पूर्वी एक-दोन कोरोना रुग्ण आढळत होते, आता त्यात झपाट्याने वाढ होत आहे. बुधवारी (दि. ५) एका दिवसात चक्क २७ नवीन कोरोना रुग्ण आढळून आले आहेत.

फार्महाऊसेस आणि त्यानंतर सुरू झालेल्या लहान-मोठ्या रिसॉर्टमुळे कर्जतची आता पर्यटन तालुका म्हणून ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे शनिवार-रविवार, तसेच सुट्टीच्या दिवशी तालुक्यातील फार्महाऊसेस आणि माथेरानला असंख्य पर्यटक येतात. सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी असंख्य पर्यटक कर्जत तालुक्यात आले होते. त्यानंतर बुधवारी एकाच दिवशी तब्बल २७ नवीन कोरोना रुग्ण आढळून आले आहेत.

दरम्यान, झपाट्याने वाढणाऱ्या रुग्णवाढीमुळे कर्जत तालुका प्रशासन सतर्क झाले असून, खबरदारी म्हणून आरोग्य यंत्रणेकडून बेडची उपलब्धता तपासली जात आहे. तालुक्यातील कोरोना रुग्णांसाठी कर्जत शहरातील उपजिल्हा रुग्णालय आरक्षित आहे. त्या ठिकाणी ७५ बेडची व्यवस्था असून, हे सर्व बेड सेंट्रल ऑक्सिजन व्यवस्थेने तयार आहेत. त्यापैकी सात बेड आयसीयूसाठी आरक्षित आहेत. आवश्यकता वाटल्यास कर्जत उपजिल्हा रुग्णालयात आणखी ५० बेडची व्यवस्था होऊ शकते. अशी माहिती कर्जत उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनोज बनसोडे यांनी दिली आहे.

# माथेरानमधील पट्टेदारांना भूखंडाचे नूतनीकरण करता येणार

## मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे आदेश

**कर्जत : बातमीदार**

वन जमिनीवर वसलेल्या माथेरानमधील शासकीय भूखंड ते वापरत असलेल्या पट्टेदारांना यापुढील काळात नूतनीकरण करता येणार आहेत. संबंधित शासकीय भूखंड वापरणाऱ्या पट्टेदार यांच्याकडून शासनाला मुद्रांक भरले जात होते. त्यामुळे या भूखंडाचे नूतनीकरण करता येणार असा महत्त्वाचा निर्णय रायगडचे मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आहे.

माथेरानमधील शासकीय भूखंड सन १९०५ पासून तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी पट्टेदारांना वाटप केले आहेत. या भूखंडांच्या अनुषंगाने ८ सप्टेंबर १९५९ रोजी माथेरान सुधारित नियमावली जाहीर असून, या नियमावलीच्या नियम क्र. ६(१) नुसार, तसेच २५ मे १९९९च्या शासन निर्णयानुसार संबंधित पट्टेदार यांना भूखंडाचे नूतनीकरण, अगर विक्री/हस्तांतरण करण्याकरिता जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घ्यावी लागते. शासनाकडून विविध प्रयोजनार्थ शासकीय जमिनी दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने अथवा कब्जाहक्काने प्रदान करण्यात येणाऱ्या शासकीय जमिनींबाबत शासन परिपत्रक २४ डिसेंबर २०२० नुसार, शासनाद्वारे किंवा शासनाच्या वतीने शासकीय जमीन तथा स्थावर मालमत्ता भाडेपट्ट्याने किंवा अन्य प्रकारे लाभार्थ्यांना हस्तांतरित करताना शासन किंवा संबंधित जिल्हाधिकारी आणि वाटपग्रही यांच्या दरम्यान निष्पादित होणाऱ्या हस्तांतरण दस्ताची नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. तथापि या हस्तांतरण दस्तावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम ाच्या अनुसूची-१ मधील अनुच्छेदानुसार यथोचित मुद्रांक शुल्क शासन जमा करावे लागते.

रायगडच्या मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी माथेरान येथील सन २०१० पासून तपासणी केलेल्या प्रकरणांमध्ये करारनामा दस्त निष्पादित न होता, नोंदणी शुल्क/मुद्रांक शुल्क शासन जमा करण्यात आल्याचे दिसून आले. त्यानुषंगाने पडताळणी समिती गठित करून, तपासणी करणे व मुद्रांक शुल्क वसूल करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश राज्याचे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी २४ ऑगस्ट २०२१ रोजी दिले होते. त्यामुळे माथेरानमधील गेल्या अनेक वर्षात नूतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या पट्टेदारांना ते भूखंड नूतनीकरण करण्याची संधी मिळणार आहे.

# म्हसळेकरांवर निसर्गाने पसरली धुक्याची चादर

## वातावरणात गारठा वाढला

**म्हसळा : प्रतिनिधी**

मागील दोन-चार दिवस म्हसळा शहर व परिसरात पहाटे शुभ्र धुक्याची चादर पसरत आहे. म्हसळा-वाडांबा, बायपास्ट, सावर रस्ता, पाभरे-खारगांव रस्ता या परिसरात दाट धुके व दवबिंदू अशा मनमोहक वातावरणाचा अनुभव गुरुवारी (दि. ६) पादचाऱ्यांनी घेतला.

या वेळी नागरिकांना आपल्या मोबाइल टॉर्चचा वापर करून धुक्यातून मार्ग काढावा लागला. सकाळी ७.३०पर्यंत सूर्यदर्शन झाले नव्हते. वाहनांचे दिवे सुरू ठेवण्याशिवाय चालकांसमोर पर्याय नव्हता.

**धुक्यात चालत असाल तर आरोग्यावर त्याचा कोणता परिणाम होणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. दमा आणि छातीत दुखणे असे आजार असणाऱ्यांनी दाट धुक्यात चालण्यास जाऊ नये.**
**-डॉ. श्रीमती देशमुख, म्हसळा**


(छाया : संजय खांबेटे)

# पाली नगरपंचायत निवडणूक रिंगणात १७ उमेदवार

## छाननीत २८ पैकी आठ अर्ज बाद

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायतीच्या चार प्रभागांतील चार जागांच्या निवडणुकीसाठी २८ नामनिर्देशन पत्रे दाखल झाली होती. मंगळवारी झालेल्या छाननीत यातील आठ नामनिर्देशनपत्रे बाद झाली. त्यामुळे आता एकूण १७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत, अशी माहिती तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी बुधवारी (दि. ५) दिली.



ओबीसी आरक्षण रद्द झाल्याने पाली नगरपंचायतच्या प्रभाग क्र. २, ५, ८ व १४ या चार प्रभागांसाठी १८ जानेवारीला निवडणूक होत आहे. प्रभाग क्रमांक २ व १४ सर्वसाधारण महिला आणि प्रभाग क्रमांक ५ आणि ८ सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित आहे. नामनिर्देशनपत्र मागे घेण्यासाठी सोमवार (दि. १०)पर्यंत मुदत आहे. त्यानंतरच येथील निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

# पत्रकार दिनानिमित्त माणगाव उपजिल्हा रुग्णालयात औषध व फळवाटप


(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

पत्रकार दिनानिमित्त माणगाव तालुका पत्रकार संघातर्फे येथील उपजिल्हा रुग्णालयात भाजपचे तालुका अध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ६) औषधे व फळांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला संजयआप्पा ढवळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालयातील नेत्रारोगतज्ज्ञ डॉ. शंतनु डोईफोडे यांच्याकडे ढवळे यांच्या हस्ते रुग्णांकरिता औषधे देण्यात आली. या वेळी रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

आविष्कार फाउंडेशनचे जिल्हा कार्याध्यक्ष शंकर शिंदे, संघटक भालचंद्र खाडे, भाजप महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा शर्मिला सत्वे, बाबुराव चव्हाण, संजय जाधव, समीर मोरे, पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख, ज्येष्ठ पत्रकार मजिद हाजिते, सचिन देसाई, उपाध्यक्ष देवयानी मोरे, स्वप्ना साळुंके, नरेश पाटील यांच्यासह परिचारिका व रुग्णालय कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

# बोर्झे गावच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही

## आमदार रविशेठ पाटील यांचे प्रतिपादन

**पेण : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार विकासाची गंगा शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्नशील असून वाशी खारेपाट विभागाच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी बुधवारी (दि. ५) बोर्झे येथे केले.

आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रयत्नाने रायगड जिल्हा नियोजन समिती मार्फत पेण तालुक्यातील बोर्झे-कणे रस्त्यासाठी २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून या कामाचे भूमि पूजन बुधवारी आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. हा विभाग माझा हक्काचा आहे. समाजाच्या विकासाठी राजकारण सोडून सर्वांनी एकत्रित आले पाहिजे, असे मत आमदार पाटील यांनी या वेळी व्यक्त केले. केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर पेण तालुक्यातील वाशीनाका ते काळेश्री या रस्त्यासाठी ७.५ कोटी रुपये उपलब्ध झाले असून प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे. खारेपाटातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्फत ३८ कोटी रुपये मंजूर झाले असून येत्या मार्चपर्यंत ही योजना पूर्ण होईल, असा विश्वास आमदार रविशेठ पाटील यांनी या वेळी व्यक्त केला.


(छाया : अनिस मनियार)

'सुनील तटकरे आज वाशी विभागात येऊन मोठ्या गमजा मारत आहेत. ते राज्याचे जलसंपदामंत्री असताना त्यांना पेण खारेपाटातील माता भगिनींच्या डोक्यावरचा हंडा दिसला नाही. खोटं बोल पण रेटून बोल, हा एकच अजेंडा त्यांनी चालवला असून स्वतः मंत्री असताना त्यांनी काय केले, हे जनतेला ठाऊक आहे. अशा भूलथापा देणाऱ्यांना वाशी विभागाची जनता कदापि स्वीकारणार नाही, असे आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, महिला मोर्चा जिल्हा चिटणीस वंदना म्हात्रे, वाशी सरपंच गोरख पाटील, बोर्झे सरपंच विजया ठाकूर, उपसरपंच विजय ठाकूर, सदस्य संभाजी पाटील, सुषमा पाटील, मयुरी ठाकूर, सुप्रिया पाटील, तसेच जितेंद्र म्हात्रे, अ. जा. ठाकूर, म. प. म्हात्रे, विवेक म्हात्रे, विलास म्हात्रे, मोरेश्वर पाटील आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी ग्रामपरिवर्तन आघाडीच्या वतीने आमदार पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

# शासकीय कर्मचाऱ्याला मारहाण; तीन आरोपींना सश्रम कारावास

**अलिबाग : प्रतिनिधी**

शासकीय कर्मचाऱ्याला मारहाण करणे तीन आरोपींना चांगलेच महागात पडले आहे. या आरोपींना अलिबाग सत्र न्यायालयाने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

अलिबाग-रोहा रोडवर वावे वळवली बस स्टॉपच्या दरम्यान १९ फेब्रुवारी २०१८ रोजी मातीने भरलेले चार ट्रक थांबवून तलाठी कमलाकर गायकवाड आणि तलाठी सुदर्शन सावंत कायदेशीर कारवाई करीत होते. त्यावेळी आरोपी सुधीर धर्मा चेरकर, हेमंत दशरत चेरकर आणि मनिष नथुराम पाटील यांनी तलाठी गायकवाड यांना शिविगाळ करून काठीने मारहाण केली. या प्रकरणी त्या तिघांविरोधात भादवी कलम ३५३,३३२,५०४,५०६ अन्वये रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाची सुनावणी तदर्थ जिल्हा व अतिरीक्त सत्र न्यायाधिश जयदीप मोहिते यांच्या न्यायालयात झाली. यावेळी शासकीय अभियोक्ता म्हणून स्मिता राजाराम धुमाळ यांनी काम पाहिले. सुनावणी दरम्यान एकूण आठ साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. यात फिर्यादी कमलाकर गायकवाड, साक्षीदार सुदर्शन सावंत, तहसीलदार प्रकाश संकपाळ, वैद्यकीय अधिकारी शीतल जोशी, पंच शेखर बळी आणि तपासीत अमंलदार जी. पी. म्हात्रे यांच्या साक्षी महत्वपुर्ण ठरल्या. दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर तिनही आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवले. आणि एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली तसेच दंडही ठोठावला आहे.

# सुधागडातील परळी गावात वाहतूक कोंडी; प्रशासनाचे दुर्लक्ष

**पाली : प्रतिनिधी**


(छाया : धम्मशील सावंत)

पाली-खोपोली राज्य महामार्गावरील महत्त्वाची बाजारपेठ असलेल्या परळी (ता. सुधागड) गावात वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे येथील पादचारी, प्रवासी व ग्रामस्थ हैराण झाले आहेत.

सुधागड तालुक्याचे प्रवेशद्वार म्हणून परळी गाव व येथील बाजारपेठेची ओळख आहे. पाली-खोपोली राज्य महामार्गाच्या दोन्ही बाजूला परळी गाव व बाजारपेठ पसरली आहे. आजूबाजूच्या चाळीस-पंचेचाळीस गावांतील तसेच आदिवासी वाड्यांतील लोक या बाजारपेठेवर अवलंबून आहेत. येथे दुतर्फा अस्ताव्यस्त उभी असलेली सहा आसनी वाहने व रिक्षा, दुचाकीमुळे इतर वाहनांना जाण्यास मार्ग मिळत नाही. नवीन वर्षात अनेकजण अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीला जात आहेत. तसेच मुंबई व पुणे आणि कोकणात जाण्यासाठी या मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. शिवाय अवजड वाहनांचीदेखील वर्दळ असते. परिणामी वाहतूक कोंडी अधिक बिकट होत आहे. यासंदर्भात वारंवार तक्रारी करूनदेखील कोणीही ठाम भूमिका घेतांना दिसत नाही, असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

> **परळी बाजारपेठ सदैव गजबजलेली असते. त्यामुळे येथे वाहतूक कोंडी होते. ही कोंडी सोडविण्यासाठी वाहनचालकांनी नियमांचे पालन करावे. ग्रामपंचायतीतर्फे याबाबत योग्य उपाययोजना करण्यात येईल.**
> **-ॲड. प्रवीण कुंभार, ग्रामपंचायत सदस्य, परळी, ता. सुधागड**

# फणसाड अभयारण्यासाठी निर्बंध लागू

## ■ लसीचे दोन डोस घेतलेल्यांनाच प्रवेश

**मुरूड : प्रतिनिधी**

कोरोना व ओमायक्रॉनचा वाढता प्रार्दुभाव लक्षात घेऊन फणसाड अभयारण्यात कोविड प्रतिबंधक लसीचे डोस न घेतलेल्या पर्यटकांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. लसीचे दोन डोस घेतलेल्या पर्यटकांनाच अभयारण्यात प्रवेश देण्यात येणार असल्याची माहिती वन परिक्षेत्रपाल राजवर्धन भोसले यांनी दिली.

फणसाड अभयारण्यात देश-विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. शांतता, घनदाट झाडी व उंच झाडामुळे पर्यटकांना हे अभयारण्य आवडते. या अभयारण्यात सध्या पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. कोरोना व ओमायक्रॉनच्या रुग्णसंख्येतही दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे अभयारण्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी निर्बंध लागू करण्यात आले आहेत. कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेल्या पर्यटकांनाच अभयारण्यात प्रवेश देण्यात येणार आहे. त्यासाठी पर्यटकांजवळ लसीच्या दोन्ही मात्रा घेतल्याच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स तसेच आधारकार्डही आवश्यक आहे.



(संग्रहित छायाचित्र)

> **कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेल्यांनाच अभयारण्यात प्रवेश देण्यात येईल. त्यासाठी लसीकरण प्रमाणपत्राची तपासणी केली जाणार आहे. या आदेशाचे, तसेच शासन नियमांचे उल्लघंन करणाऱ्या पर्यटकांवर कारवाई करण्यात येईल.**
> **-राजवर्धन भोसले, वनपरिक्षेत्रपाल, फणसाड अभयारण्य, ता. मुरूड**


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, प्लॉट नं.०८, रोड विजयमार्ग, सेक्टर नं. ११, नवीन पनवेल, पुर्व, क्षेत्र २१०.०० चौ. मी.,

येथील खालील वर्णनाची मिळकत ही डॉ. के.एस. वर्गीस यांच्या मालकीची असून, तरी सदर मिळकत माझे आशिल यांनी वरिल विद्यमान मालकाकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदरच्या मिळकती संदर्भात मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**प्लॉट नं.०८, रोड विजयमार्ग, सेक्टर नं. ११, नवीन पनवेल, पुर्व, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. क्षेत्र २१०.०० चौ. मी.**

प्राप्त परीस्थिती वरील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या सदर फ्लॉट मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी अन्य हक्क हितसंबध असल्यास त्या व्यक्तींना वा संबधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसाचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणारे यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविहरीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजण्यास येईल. त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपुर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण :- पनवेल.

**सही/-**
**ॲड. वृषाली जितेंद्र वाघमारे**
ऑ. ०२, हेरीटेज को-ऑप. हौ. सोसायटी, सेक्टर-५, प्लॉट नं. २२, नवीन पनवेल.


# जिल्ह्यात कोरोना रुग्णसंख्येत वाढ

## ३७१ ॲक्टिव्ह रुग्ण; २२३८ जण घेताहेत घरीच उपचार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात नववर्षाच्या सुरुवातीलाच कोरोनाच्या रुग्णसंख्येत झपाट्याने वाढ होऊ लागली आहे. ही चिंतेची बाब असली तरी, रुग्णांमध्ये सौम्य लक्षणे असल्याने ती एक समाधानकारक बाब आहे. रायगडात सद्यस्थितीत दोन हजार ३७१ ॲक्टिव्ह रुग्ण आहेत. यामध्ये २२३८ जणांना कोरोनाची सौम्य लक्षणे असल्याने ते घरी विलगिकरण राहून उपचार घेत आहेत. १०९ रुग्ण ऑक्सिजनवर असून २४ जण अतिदक्षता विभागात उपचार घेत आहेत. जिल्ह्यात एकही रुग्ण व्हेंटिलेटरवर नाही.

रायगड जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्यापासून कोरोना प्रादुर्भाव आटोक्यात येण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे पुन्हा सर्व व्यवहार पूर्वपदावर आले होते. मात्र २०२२ साल सुरू झाले आणि पुन्हा कोरोनाचा उद्रेक झाला. ३१ डिसेंबरपासून जिल्ह्यात रोज शंभरहून अधिक रुग्ण आढळून येत आहेत. सद्यस्थितीत जिल्ह्यात दोन हजार ३७१ ॲक्टिव्ह रुग्ण आहेत. जिल्ह्यात कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहीम सुरू केली होती. पहिला डोस ९२ टक्के नागरिकांनी घेतला असून दुसरा डोस ७२ टक्के नागरिकांनी घेतला आहे. १५ ते १८ वयोगटातील युवक, युवतींचेही लसीकरण सुरू आहे. लसीकरण मोहीम जिल्ह्यात राबविण्यात आल्याने अनेकांच्या शरिरात प्रतिकार शक्ती वाढली आहे. त्यामुळे रुग्णसंख्या वाढत असली तरी नागरिकांना कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे अनेक कोरोना बाधित रुग्ण घरातच राहून उपचार घेत आहेत. जिल्हा प्रशासनाकडून तिसरी लाट थोपविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.


### जाहीर प्रसिध्दीकरण

पनवेल विकास गटऔद्योगिक विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्या., पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या सन २०२२ ते २०२७ या कालावधीचे पंचवार्षिक निवडणूकीसाठी संस्थेचे अधिमंडळाची विशेष बैठक पनवेल विकास गटऔद्योगिक विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्या., पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड संस्थेचे कार्यालयात दिनांक २३/०१/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता उपविधींतील तरतुदींनुसार संचालक मंडळाची निवड करणेसाठी बोलविण्यात आली आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती. तसेच निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, सुशिला निवास, मिडलक्लास हौसिंग सोसा. पनवेल यांचे कार्यालयात पहावयास मिळेल याची संस्थेच्या सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

दि. ६/०१/२०२२

**सही/-**
**(दत्तात्रय धायगुडे)**
निवडणूक निर्णय अधिकारी

### जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट

**प्रशासन विभाग**

जेएनपीटी, पदवीधर/टेक्निशियन (डीप्लोमा)/ टेक्निशियन (१०+२ व्होकेशनल) यासाठी अप्रेंटिसेस कायदा १९६१ यानुसार खालीलप्रमाणे एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी उमेदवार घेऊ इच्छिते.

| क्र. स. | प्रशिक्षणाचा प्रकार | उमेदवारांची संख्या | उमेदवारांच्या प्रशिक्षणाची मुदत | प्रतिदरमहा विद्यावेतन |
|---|---|---|---|---|
| १ | **बॅचलर ऑफ इंजिनियरिग** | | | |
| | ❖ इलेक्ट्रिकल | ०३ | एक वर्ष | रु.९,०००/- |
| | ❖ इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन | ०२ | एक वर्ष | रु.९,०००/- |
| | ❖ मॅकेनिकल | ०४ | एक वर्ष | रु.९,०००/- |
| २ | **डिप्लोमा इंजिनियरिग** | | | |
| | ❖ सिव्हील | ०२ | एक वर्ष | रु.८,०००/- |
| | ❖ इलेक्ट्रिकल | ०२ | एक वर्ष | रु.८,०००/- |
| | ❖ मॅकेनिकल | ०३ | एक वर्ष | रु.८,०००/- |
| ३ | **१०+२ व्होकेशनल खालील कोर्स पूर्ण केलेला** | | | |
| | ❖ अकौंटींग ॲण्ड ऑडीटिंग | ०३ | एक वर्ष | रु.७,०००/- |
| | ❖ ऑफिस सेक्रेटरी/स्टेनो | ०४ | एक वर्ष | रु.७,०००/- |
| | ❖ परचेसींग ॲण्ड स्टोअरकीपीग | ०२ | एक वर्ष | रु.७,०००/- |

ज्या उमेदवारानी त्यांची पदवी/डिप्लोमा (ए.आय.सी.टी.इ. ने मंजूर केलेली) आणि १०+२ व्होकेशनल कोर्स वर्ष २०२० मध्ये किवा त्यानंतरच्या वर्षात उत्तीर्ण केले आहे, तेच फक्त उमेदवारीसाठी पात्र आहेत.

उमेदवारानी आपले अर्ज बी.ओ.ए.टी. च्या वेबसाईट www.mhrdnats.gov.in वर ऑन लाईन नोंदणी (Registration) करून त्याची प्रत आपल्या अर्जासोबत जोडून व्यवस्थापक (कार्मिक व औ.स.), प्रशासकीय इमारत, शेवा, तालुका उरण, जि. रायगड, नवी मुंबई ४००७०७ यांच्या कार्यालयात सर्व प्रमाणपत्रांसह दि. २१.०१.२०२२ पूर्वी पाठवावेत. जेएनपीटीमध्ये प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर उमेदवाराला नोकरी देण्याची कोणतीही हमी जेएनपीटी प्रशासन देत नाही.

**व्यवस्थापक (कार्मिक व औ.स.)**

### ग्रुप ग्रामपंचायत वडघर
ता. पनवेल, जि. रायगड

**जाहीर निविदा**

सर्व नोंदणीकृत ठेकेदार यांस कळविण्यांत येते की, खालील प्रमाणे कामासाठी सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी नोंदणीकृत ठेकेदारांनी दिनांक - ०७/०१/२०२२ ते १७/०१/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा १८/०१/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता उघडणेत येतील त्यावेळी उपस्थित रहावे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | सन | १% इसारा रक्कम | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत व वेळ | निविदा फॉर्म स्वीकारण्याची अंतिम तारीख व वेळ | शेरा (निविदा फॉर्म फी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | वडघर उर्दूशाळा छतातून होणारी पाण्याची गळती थांबविण्यासाठी खोल्या बांधणे. | २०४०७३ | १४ वा वित्त आयोग | २०१७-२०१८ | २०४० | | | |
| ०२. | कोपर आदिवासी वाडी येथे स्मशानभूमी व शेड बांधणे. | २१६०४५ | १४ वा वित्त आयोग | २०१७-२०१८ | २१६० | | | |
| ०३. | कोपर आदिवासी वाडी अंतर्गत पदपथ रस्ता करणे. | ९९००० | १४ वा वित्त आयोग | २०१६-२०१७ | ९९० | | | |
| ०४. | अंगणवाडी इमारत दुरुस्ती व रंगरंगोटी करणे-वडघर बौद्धवाडा | १७६१७२ | १४ वा वित्त आयोग | २०१७-२०१८ | १७६१ | | | |
| ०५. | शाळेय शौचालय बांधणे व दुरुस्ती व शाळा रंगरंगोटी २ प्रा.शाळा-वडघर मोहल्ला | २६०४३० | १४ वा वित्त आयोग | २०१७-२०१८ | २६०४ | | | |
| ०६. | कोपर आदिवासी वाडी येथे धोबीघाट व शेड बांधणे. | ६०००० | १४ वा वित्त आयोग | २०१७-२०१८ | ६०० | ०७/०१/२०२२ ते १३/०१/२०२२ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | १७/०१/२०२२ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | १०० रु. |
| ०७. | वडघर मोहल्ला अब्बीदीन चौगुले ते नाझ अपार्टमेंट पर्यंत पेव्हरब्लॉक बसविणे. | २००००० | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | २००० | | | |
| ०८. | वडघर मोहल्ला मेटकरवाडी शौचालय ते मेन रस्त्यापर्यंत पेव्हरब्लॉक टाकणे. | १२८८०२ | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | १२८८ | | | |
| ०९. | वडघर बौद्धवाडी सोनावणे घर ते रणयेवले घरापर्यंत गटार बांधणे. | ४००००० | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | ४००० | | | |
| १०. | वडघर मोहल्ला जुन्या शाळेवर शेड बांधणे. | २५०००० | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | २५०० | | | |
| ११. | वडघर मोहल्ला नावडेकर दुकान ते सिडको मेन गटारपर्यंत पाईप गटार बांधणे. | १९४४८७ | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | १९४४ | | | |
| १२. | कोपर नवीन वस्तीत अंतर्गत नवीन गटार बांधणे. | २९८००० | १५ वा वित्त आयोग | २०२०-२०२१ | २९८० | | | |
| १३. | वडघर मोहल्ला बिलाल पटेल घर ते शब्बीर कल्याणकर गटार दुरुस्ती करणे. | २००००० | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | २००० | | | |
| १४. | वडघर मोहल्ला सलीम पेशइमाम ते सिडको मेन गटार पर्यंत गटार बांधणे. | २०४०७० | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | २०४० | | | |
| १५. | वडघर बौद्धवाडी स्मशानभूमीची पडलेली भींत बांधणे. | ९०००० | १५ वा वित्त आयोग | २०२०-२०२१ | ९०० | | | |
| १६. | ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे. (चिंचपाडा येथील विठ्ठलवाडी येथील दोन युनिट शौचालय दुरुस्ती करणे.) | ३९४४२९ | १५ वा वित्त आयोग | २०२०-२०२१ | ३९४४ | | | |

**अटी/शर्ती**
१. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळात पहावयास मिळेल.
२. इसारा रक्कम रोखीत भरावा लागेल. (इसारा रक्कम न भरल्यास निविदा अवैध ठरविण्यात येईल)
३. निविदा किंमत नापरतावा समजावी.
४. नियमा प्रमाणे आयकर तसेच इतर कर भरावे लागतील.
५. ठेकेदार नोंदणीकृत (Register) असावा.
६. निविदा मंजूर केल्यास रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
७. ५ %टक्के सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
८. इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसांनी कामाचा दर्जा पाहून परत मिळेल.
९. वर्क ऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पुर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रा.पं.ने काम करुन घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार राहावे लागेल.
१०. कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
११. वरील अटी व शर्ती मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

जावक क्रमांक : ०२/२०२२
दिनांक : ०६/०१/२०२२

**सही/-**
**(श्री. नं.कृ. भगत)**
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत वडघर

**सही/-**
**(श्री. मुकेश ना. कांबळे)**
प्रशासक
ग्रामपंचायत वडघर

# महिला वर्ल्डकपसाठी टीम इंडियाची घोषणा; मिताली राजकडे नेतृत्व



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या वर्षी न्यूझीलंडमध्ये होणाऱ्या महिला विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. १५ सदस्यीय संघाचे नेतृत्व मिताली राज करणार आहे, तर हरमनप्रीत कौरला संघाची उपकर्णधार बनवण्यात आले आहे.

भारतीय संघ विश्वचषकातील पहिला सामना पाकिस्तानविरुद्ध खेळणार आहे. हा सामना ६ मार्च रोजी बे-ओव्हल तौरंगा येथे होणार आहे. हा १५ सदस्यीय संघ विश्वचषकापूर्वी न्यूझीलंडविरुद्ध ५ सामन्यांची वनडे मालिका खेळेल. या मालिकेतील पहिला सामना ११ फेब्रुवारीला होईल.

वर्ल्डकपमध्ये भारताचा दुसरा सामना १० मार्च रोजी न्यूझीलंड विरुद्ध, १२ मार्च रोजी वेस्ट इंडिज आणि चौथा सामना १६ मार्च रोजी इंग्लंड विरुद्ध होणार आहे. भारतीय महिला संघ १९ मार्च रोजी ऑकलंडमध्ये ऑस्ट्रेलियाशी भिडणार आहे, तर बांगलादेश आणि दक्षिण आफ्रिका २२ आणि २७ मार्चला भिडणार आहेत. यंदाच्या महिला विश्वचषकाची सुरुवात ४ मार्च रोजी यजमान न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यातील सामन्याने होईल.

संघ : मिताली राज (कर्णधार), हरमनप्रीत कौर (उपकर्णधार), स्मृती मंधाना, शफाली वर्मा, यास्तिका भाटिया, दीप्ती शर्मा, ऋचा घोष (यष्टीरक्षक), स्नेह राणा, झुलन गोस्वामी, पूजा वस्त्राकर, मेघा सिंग, रेणुका सिंग ठाकूर, तानिया भाटिया (यष्टीरक्षक), राजेश्वरी गायकवाड, पूनम यादव. स्टँडबाय खेळाडू : एकता बिश्त, सिमरन दिल बहादूर आणि साभिनेनी मेघना.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत बाद फेरीसाठी चुरस

**सातारा : प्रतिनिधी**

पाचगणी व्यायामशाळा आयोजित व्यावसायिक पुरुष व महिला गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेतील पुरुषांच्या अ गटात महिंद्रा, मुंबई बंदर, मुंबई महापालिका या संघांमध्ये बाद फेरी गाठण्यासाठी चुरस निर्माण झाली आहे.

महिंद्राने मुंबई बंदर संघाला २०-१४ असे पराभूत करीत बाद फेरी गाठण्याच्या आपल्या आशा जिवंत ठेवल्या. महिंद्राकडून ओमकार कुंभार, शुभम बोडके, शेखर तटकरे, तर मुंबई बंदरकडून आशिष मोहिते, ज्ञानेश जाधव, गणेश दरगे छान खेळले. याच गटात मुंबई बंदरने मुंबई महापालिकेचा ३४-२६ असा आणि पुण्याच्या जीएसटीचा २९-२७ असा पराभव करीत दोन विजय मिळवित आपणही या शर्यतीत मागे नाही हे दाखवून दिले. अजिंक्य पवार, अक्षय सोनी, निलेश शिंदे या विजयाचे शिल्पकार ठरले. याच गटात मुंबई महापालिकेने जेजे रुग्णालयाला ३०-१७ असे नमवित साखळीतील दुसऱ्या विजयाची नोंद केली. सौरभ पार्टे, अभिषेक नर या विजयात चमकले.

पुरुषांच्या क गटात पुण्याच्या आयकरने महाराष्ट्र पोलीस संघाचा १४-१३ असा, तर मुंबईच्या सेंट्रल बँकेचा ४२-१९ असा पराभव करीत दोन साखळी विजयासह बाद फेरीतील आपला मार्ग सुकर केला. अक्षय जाधव, मोमीन शेख, अक्षय बोडके, तुषार पाटील या विजयात चमकले. याच गटात रिझर्व्ह बँकेने सेंट्रल बँकेला २९-२६ असे चकविले. साईराज कुंभार, जयेश यादव यांनी या विजयात चढाई पकडीचा उत्कृष्ट खेळ केला. सेंट्रल बँकेचे पंकज सावंत, निखिल कदम बरे खेळले. ड गटात मध्य रेल्वे डिव्हिजनने पुणे पोलिसांचा ३४-१६ असा पाडाव केला. मकरंद शिंदे, कल्पेश पाटील, सोमनाथ कोळी यांच्या चतुरस्त्र खेळाने रेल्वेने हा विजय साकारला. पोलिसांचे अनिकेत शेंडे, संदीप शेळके छान खेळले.

महिलांच्या ब गटात राजमाता जिजाऊ संघाने सलोनी गजमल, मंदिरा कोमकर, ऋतुजा मेगडे, पालवी जमदाडे यांच्या चढाई पकडीच्या सर्वोत्तम खेळाच्या जोरावर स्वामी समर्थचा ६७-१६ असा धुव्वा उडविला. मध्यांताराला ३२-०७ अशी आघाडी घेणाऱ्या राजमाताने उत्तरार्धात अधिक जोरकस खेळ करीत गुणांचे अर्धशतक ओलांडले. स्वामी समर्थची प्रतीक्षा धामणकर एकाकी लढली.

## जोकोविचचा व्हिसा केला रद्द

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

कोरोना महामारीच्या काळात टेनिस स्पर्धा ऑस्ट्रेलिया ओपनचे आयोजन केले जात आहे. १७ जानेवारीपासून ही स्पर्धा सुरू होणार आहे, मात्र त्यापूर्वीच मोठा गदारोळ माजला आहे. नंबर वन टेनिसपटू नोव्हाक जोकोविचचा व्हिसा रद्द करण्यात आला आहे.

२० ग्रँडस्लॅम जिंकणारा जोकोविच मेलबर्नला पोहचला, पण त्याला एक तास विमानतळावर थांबवण्यात आले. आवश्यक कागदपत्रे नसल्यामुळे त्याचा व्हिसा रद्द करण्यात आला.

## आरोग्य प्रहर

### हिवाळ्यात अति गूळ खाणे आरोग्यासाठी हानिकारक

गूळ आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानला जातो. विशेषतः हिवाळ्यात गूळ खाण्याचे अनेक फायदे आहेत. गूळ औषधी गुणांनी परिपूर्ण मानले जातो. आयुर्वेदातही गुळाचे अनेक फायदे सांगितले आहेत. गुळामुळे शरीराला अनेक फायदे मिळत असले तरी त्याचे काही तोटेही आहेत. गुळाचे जास्त सेवन करणे तुमच्यासाठी हानिकारक ठरू शकते. चला जाणून गुळाच्या तोट्याबद्दल.



**नाकातून रक्त येणे :** गुळाचा गुणधर्म गरम असतो. त्यामुळे गुळाचे जास्त सेवन केल्याने शरीरातील उष्णता वाढू शकते. यामुळे नाकातून रक्त येऊ शकते. विशेषतः उन्हाळ्यात गूळ खाऊ नये.

**झपाट्याने वजन वाढणे :** जे लोक डायटिंग करतात त्यांनी गुळाचे जास्त सेवन टाळावे. गुळात कॅलरीजचे प्रमाण खूप जास्त असते. त्यामुळे तुमचे वजन वाढू शकते.

**रक्तातील साखर वाढते :** गुळामुळे साखरेसारखी हानी होत नाही, मात्र अतिसेवनामुळे वजन वाढण्याचा धोका असतो. असे म्हटले जाते की १० ग्रॅम गुळात ९.७ ग्रॅम साखर असते. त्यामुळे एका दिवसात गूळ मर्यादित प्रमाणात खा. इतकेच नाही तर गुळाच्या अतिसेवनामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढण्याचीही शक्यता असते.



पनवेल : वैकुंठवासी ह. भ. प. गणपतबुवा पाटील यांच्या स्मरणार्थ श्री गावदेवी क्रिकेट संघ कोप्रोली यांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. त्यांचे आयोजकांनी स्वागत केले. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस सुनील पाटील, कोप्रोलीचे माजी सरपंच रमेश पाटील, आयोजक रोशन पाटील, धनंजय पाटील आदी उपस्थित होते.



उरण : द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या २१व्या रायगड जिल्हास्तरीय युवा महोत्सवात द्रोणागिरी श्री शरीरसौष्ठव स्पर्धा झाली. या स्पर्धेत दिघाटी (ता. पनवेल) येथील अनिकेत जनार्दन पाटील याने प्रथम क्रमांक पटकाविला.








पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे पारितोषिक वितरण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी व साहित्यिक रामदास फुटाणे, कवी व गजलकार दिलीप पांढरपट्टे, ललित मासिकाचे स्तंभलेखक रविप्रकाश कुलकर्णी, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख आदी उपस्थित होते. या वेळी दिवाळी अंकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. (विजेत्यांची छायाचित्रे उद्याच्या अंकात)





## राम प्रहर अर्थसाक्षर प्रश्नमंजुषा

आपल्या दैनिक राम प्रहरमध्ये दर रविवारी अर्थ प्रहर सदर प्रकाशित होते. या सदरातून वाचकांना अर्थविषयक माहिती देण्यात येते. ही माहिती 'राम प्रहर'च्या वाचकांसाठी लाभदायक ठरत असते. याच सदरात दर रविवारी आता वाचकांसाठी प्रश्नमंजुषा सुरू करीत आहोत.

'अर्थसाक्षर' या शीर्षकाखाली दर रविवारी प्रश्नमंजुषेमध्ये वाचकांना तीन प्रश्न विचारण्यात येतील. या प्रत्येक प्रश्नासोबत चार पर्यायी उत्तरे दिली जातील. त्यातील योग्य उत्तर वाचकांनी निवडायचे आहे. निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या 7738106009 या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

या तिन्ही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तिन्ही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील. तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com